| | | | | |
|---|---|---|---|---|
| **CNR No.MHST090007282025** | प्राप्त दिनांक | –१७.०६.२०२५ | | |
| | नोंदणी दिनांक | –१७.०६.२०२५ | | |
| | निकाल दिनांक | –०६.०६.२०२६ | | |
| | कालावधी | – वर्षे | महिना | दिवस |
| | | ०० | ११ | २० |

**कोरेगाव येथील न्यायदंडाधिकारी वर्ग–१, यांचे न्यायालयात,ता. कोरेगाव,जि. सातारा.**

(पिठासिन अधिकारी पी.डी.यवतकर)

**नियमीत फौजदारी खटला क्र.११९/२०२५** **निशाणी क्र. २३**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम खबर अहवालचा तपशिल:** | **अपराध क्र.:** | ८१/२०२५ दिनांकः१७.०४.२०२५ |
| | **पोलीस स्टेशन:** | रहिमतपूर, ता. कोरेगाव, जि. सातारा. |

| | |
|---|---|
| **फिर्यादी:** | **महाराष्ट्र शासन,**<br>तर्फे पोलीस ठाणे अंमलदार,<br>रहिमतपूर, ता. कोरेगाव, जि. सातारा. |
| **अभियोग पक्षाचे विधिज्ञ:** | सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन.एन.पवार. |
| **आरोपी:** | १) **विक्रम विष्णु केंजळे**<br>वय – ३६ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>२) **सौ.भाग्यश्री विक्रम केंजळे**<br>वय – ३२ वर्षे, व्यवसाय– गृहीणी,<br>३) **सौ.माधुरी राहुल केंजळे**<br>वय – ३५ वर्षे, व्यवसाय– गृहीणी, |

| | |
|---|---|
| | ४) **राहुल विष्णु केंजळे**<br>वय – ३६ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>सर्व रा. कठापुर, ता.कोरेगाव, जि.सातारा. |
| **आरोपीचे विधिज्ञ:–** | विधीज्ञ श्री.आर.के.चव्हाण, आरोपींकरिता |

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | ०९.०४.२०२५ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १७.०४.२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १७.०६.२०२५ |
| दोषारोप निश्चितीचा दिनांक | ०३.०६.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०३.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | ०६.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०६.०६.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाचा दिनांक, असेल तर | निरंक |

**आरोपीचा तपशिल**

| क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिन दिनांक | दोषारोपाचे कलम | आरोपी दोषी की निर्दोष | किती शिक्षा | बंदीवान म्हणुन असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br>४. | विक्रम विष्णु केंजळे<br>सौ.भाग्यश्री विक्रम केंजळे<br>सौ.माधुरी राहुल केंजळे<br>राहुल विष्णु केंजळे | --- | ०३.०६.२०२५ | भा.न्या.संहिता ११८(१), ३५१(२), ३५२ ३(५) | निर्दोष | निरंक | निरंक |

| अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी | | | |
|---|---|---|---|
| क्रमांक | निशाणी | नाव | साक्षीदाराचा प्रकार |
| १ | १८ | सतिश रामचंद्र केंजळे | फिर्यादी |

| बचावपक्षाच्या साक्षीदारांची यादी | | |
|---|---|---|
| क्र. | नाव | साक्षीदाराचा प्रकार |
| ब.सा.–१ | निरंक | निरंक |

| न्यायालयीन साक्षीदारांची यादी | | |
|---|---|---|
| क्र. | नाव | साक्षीदाराचा प्रकार |
| न्या.सा.–१ | निरंक | निरंक |

| अभियोगपक्षाच्या निशाणी क्रमांकाची यादी | | |
|---|---|---|
| क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
| १. | नि.क्र.१९/अ.सा.क्र.१ | फिर्यादवरील सही |

| बचावपक्षाने मान्य केलेले कागदपत्रे | | |
|---|---|---|
| क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
| १. | नि.क्रं. २१ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | नि.क्रं. २२ | वैद्यकीय प्रमाणपत्र |

| बचावपक्षाच्या निशाणी क्रमांकाची यादी | | |
|---|---|---|
| क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
| १. | निरंक | निरंक |

| न्यायालयातर्फे दिलेल्या निशाणी क्रमांकाची यादी | | |
|---|---|---|
| **क्र.** | **निशाणी क्रमांक** | **पुराव्याचा प्रकार** |
| १. | निरंक | निरंक |

| न्यायालयासमोर आलेला मुद्देमाल | | |
|---|---|---|
| **क्र.** | **निशाणी क्रमांक** | **पुराव्याचा प्रकार** |
| १. | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

(दि.०६.०६.२०२६ रोजी घोषित )

प्रस्तुत खटल्यात आरोपी यांचे विरूध्द भारतीय न्याय संहिता,२०२३ चे कलम ११८(१),३५१(२),३५२, ३(५) अन्वये आरोप ठेवण्यात आलेला आहे.

**अभियोग पक्षाने दाखल केलेल्या प्रकरणाचा तपशिल पुढीलप्रमाणेः-**

२) वर्दीदार सतिश रामचंद्र केंजळे यांनी खबर दिली की, दिनांक ०९/०४/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वा.चे सुमारास मौजे कठापुर, ता.कोरेगाव, जि.सातारा गावचे हद्दीत कठापूर गावचे उंबरी नावचे जमीन गट क्र.२२९ मध्ये शेतीची मशागत करीत असताना विक्रम विष्णू केंजळे, माधुरी राहुल केंजळे, भाग्यश्री विक्रम केंजळे, राहुल विष्णू केंजळे हे तेथे आले व विक्रम केंजळे फिर्यादीला

म्हणाला की दोघांच्या शेतामधील बांध का काढला आहेस असे म्हणालेनंतर, फिर्यादी त्यास म्हणाले की आपण मोजणी आणुया व हद्द फिक्स करुया असे म्हणाले असता विक्रम विष्णु केंजळे याने खड्डा खोदून पोल उभा करण्यास सुरुवात केली, त्यावेळी फिर्यादीने त्यास पोल उभा करु नकासे असे म्हणाले असता विक्रम केंजळे याने तेथे पडलेला दगड उचवून फिर्यादीचे डोकीत डाव्या बाजुला मारला, त्यानंतर विक्रम, माधुरी, भाग्यश्री व राहुल केंजळे यांनी सर्वांनी मिळून फिर्यादीच्या अंगावर धवून येवून शिवीगाळ दमदाटी केली, त्यानंतर आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली.

३) घटनेनंतर वर्दीदाराने दिलेल्या फिर्यादीवरून कोरेगाव पोलीस ठाणे येथे गु.र.क्रमांक ८१/२०२५, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ३५१(२),३५२,३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार आर.डी.कणसे यांना सोपविण्यात आला. त्यांनी तपासा दरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले, पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला, गुन्हयात वापरलेला दगड जप्त केला, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व तपासात आरोपी विरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्याच्या विरूध्द न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले.

४) दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आल्यानंतर आरोपी हजर झाल्यावर त्यांना त्यांच्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप (नि.९) वाचून दाखवण्यात आला. त्यांनी दोषारोपपत्रामध्ये गुन्हा कबूल नाही असे सांगून अभियोगाची मागणी केली. अभिलेखावर आलेल्या पुराव्याअंति आरोपीं विरुध्द कोणताही आक्षेपहार्य पुरावा न आल्यामुळे त्यांचे विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब वगळण्यात आला.

५) याकामी उभय पक्षातर्फे करण्यात आलेला युक्तिवाद ऐकता व सादर करण्यात आलेला पूरावा पाहता माझ्या विचारार्थ निघालेले मुद्दे व निष्कर्ष खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, दि. ०९/०४/२०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वा.चे सुमारास मौजे कठापुर, ता.कोरेगाव, जि.सातारा येथील उंबरी नावचे शेत जमीन गट क्र. २२९ मध्ये आरोपींनी आपापसात संगनमत करुन फिर्यादी सतिश रामचंद्र केंजळे यास खड्डा खोदुन पोल उभा करण्याच्या कारणावरुन दगडाने डोकीस डाव्या बाजुला मारहाण करुन जाणीवपूर्वक गंभीर दुखापत पोहोचवली आणि त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ११८(१) सह ३(५) अन्वये शिक्षेस पात्र | |

| | | |
|---|---|---|
| | असलेला गुन्हा केला ? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपासात संगनमत करुन फिर्यादीस फौजदारी पात्र धाकदपटशा केला आणि त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२) सह ३(५) अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपापसात संगनमत करुन सार्वजनिक शांततेचा भंग होईल याची जाणीव असताना देखील फिर्यादी यास शिवीगाळ करुन, सार्वजनिक शांततेचा भंग करण्याच्या उद्देशाने प्रक्षोभित करुन भारतीय न्याय संहिता कलम ३५२ सह ३(५) अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | नाही. |
| ४. | काय आदेश ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## **का र ण मि मां सा**

६) आरोपींवर ठेवण्यात आलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादी सा.क्र.१ सतिश रामचंद्र केंजळे यांना नि.क्र.१८ प्रमाणे तपासलेले आहे. त्यानंतर फिर्यादीने प्रकरणामध्ये त्याला पुढे कोणताही पुरावा दयायचा नाही

अशी पुरसीस पटलावर नि.क्र.२० वर दाखल केल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला.

**<u>मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबतः-</u>**

७) अभियोग पक्षातर्फे फिर्यादी सा.क्र.१ सतिश रामचंद्र केंजळे यांनी त्यांचे सरतपासात दि.०९/०४/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वा.चे सुमारास मौजे कटापूर गावच्या हद्दीमध्ये उंबरे नावच्या शिवारात शेत जमीन गट क्र.२२९ मध्ये शेतीची मशागत करीत असताना विक्रम विष्णू केंजळे हा मला म्हणाला की, दोघांच्या शेतामधील बांध का काढला आहे, त्यावर मी म्हणालो की आपण मोजणी आणू या व हद्द फिक्स करु असे म्हणालो असता विक्रम विष्णू केंजळे याने खड्डा खोदून पोल उभारण्यास सुरुवात केली, त्यावर मी त्याला पोल उभा करु नकोस असे म्हणालो असता विक्रम केंजळे याने तेथे पडलेला दगड उचलून माझ्या डोक्याच्या डाव्या बाजुस मारला, त्यावेळी विक्रम केंजळे, माधुरी केंजळे, भाग्यश्री केंजळे व राहुल केंजळे या सर्वांनी माझ्या अंगावर धावून येवून शिवीगाळ व दमदाटी केली ही सर्व कथने नाकारलेली आहेत. त्यांनी फिर्यादवरील त्यांची सही ओळखली, परंतु फिर्याद मधील मजकूर नाकारला, त्यामुळे फिर्यादीची फिर्याद सिध्द झाली नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदारांना अभियोग पक्षाने फितुर घोषित करुन उत्तर सुचक प्रश्न विचारले असता अभियोग पक्षास मदत होईल अशी

कोणतीही बाब पटलावर आलेली नाही. याउलट, सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये आरोपी व त्याच्या मध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याचे मान्य केले आहे.

८) अभिलेखावर दाखल असणारा पुरावा व संपुर्ण अभिलेखाचा अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फिर्यादी व आरोपी मध्ये तडजोड करणेस परवानगी मिळणेबाबतचा विनंती अर्ज नि.क्र.१६ प्रमाणे व तडजोड पुरसीस नि.क्र.१७ प्रमाणे दाखल केली आहे. परंतु, सदर गुन्हयातील भारतीय न्याय संहिता कलम ११८(१) अन्वये हा तडजोड पात्र नसल्याने सदरची तडजोड केवळ दाखल करण्यात आलेली आहे. नि.क्र.२० वरील पुरसीस अन्वये फिर्यादीने त्यास इतर कोणतेही साक्षीदार तपासावयाचे नाहीत अथवा लेखी पुरावा दयायचा नाही असे कथन केले आहे. सबब, फिर्यादीची आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार नाही. त्यामुळे त्याचा पुरावा पाहता पुढील साक्षीदारांची साक्ष घेवून देखील सदर गुन्हा शाबित होवू शकत नसल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला आहे. तसेच **मदन मोहन अबोट वि. स्टेट ऑफ पंजाब, ए.आय.आर. २००८ सुप्रिम कोर्ट १९६९** या न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने विषद केले आहे की, फौजदारी वाद आपापसांत मिटले असतील तर न्यायालयाने विनाकारण वेळ खर्च करणे उचित नाही.

९) अभिलेखावर दाखल असणारा पुरावा व संपुर्ण अभिलेखाचा अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फिर्यादी यांची आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार नाही. तसेच, आरोपीने फिर्यादी यास दगडाने मारुन जाणीवपूर्वक गंभीर दुखापत पोहोचवली, फिर्यादीस शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली असा कोणताही ठोस पुरावा पटलावर आलेला नाही. तसेच, स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष पटलावर नाही. फिर्यादीने त्याचे व आरोपीमध्ये तडजोड झाल्याचे मान्य केले असल्यामुळे, अभियोग पक्षाने फिर्याद सिध्द केली नाही.

१०) अभियोग पक्षातर्फे आरोपीं विरूध्द भारतीय न्याय संहिता,२०२३ चे कलम ११८(१), ३५१(२), ३५२, ३(५) अन्वये मधील कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हा शाबित करणारा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. तसेच आरोपी विरूध्द कायदेशीर तरतुदींनुसार कोणताही गुन्हा शाबित होत नसल्याने मी **मुद्दे क्र.१ ते ३** चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**मुद्दा क्र.४ करीता –**

११) वरील मुद्दे क्र.१ ते ३ च्या निष्कर्शानुसार मी या निष्कर्शास आले आहे की, आरोपी विरुध्द सदर गुन्हयाचे कामी कोणताही पुरावा न आल्यामुळे गुन्हा

शाबीत झालेला नाही. त्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. सबब मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी नामे **१) विक्रम विष्णु केंजळे, २) सौ.भाग्यश्री विक्रम केंजळे, ३) सौ.माधुरी राहुल केंजळे व ४) राहुल विष्णु केंजळे** यांची भारतीय न्याय संहिता,२०२३ चे कलम ११८(१), ३५१(२),३५२, ३(५) अन्वये या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता केली आहे.

२. आरोपीचा जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

३. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल दगड हा मुल्यहीन असल्याने तो अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७अ अन्वये प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/– चा जामीन दयावेत.

(*न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.*)

PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR
Digitally signed by PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR
Date: 2026.06.06 16:51:15 +0530

दिनांक – ०६/०६/२०२६ **( पी.डी.यवतकर )**
कोरेगाव प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,कोरेगाव
ता.कोरेगाव, जि.सातारा.